# प्रेस नोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०३/०८/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | राजेंद्र नथ्थुजी बोलके, वय ५६ वर्षे, पद : कनिष्ठ अभियंता, पं.स.धारणी, जि.अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक : ०३/०८/२०२२ चे १५.३३ ते १६.२५ वा. दरम्यान |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | ५,०००/— रुपये |
| ५ | घटनास्थळ | कार्यालय उपविभागीय अधिकारी, जि.प.बांधकाम उपविभाग धारणी, जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे कंत्राटदार असुन त्यांनी केलेल्या सिमेंट रोड व नालीचे ३,००,०००/— रुपयाचे कामाची पाहणी व मोजमाप पुस्तीका (एम.बी.) तयार करुन देणेकरीता पंचायत समिती, धारणी, जि.अमरावती येथील कनिष्ठ अभियंता श्री.बोलके हे तक्रारदार यांचेकडे २ टक्के प्रमाणे ६,०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक ०२.०८.२०२२ रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०३.०८.२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांनी केलेल्या सिमेंट रोड व नालीचे ३,००,०००/— रुपयाचे कामाची पाहणी व मोजमाप पुस्तीका (एम.बी.) तयार करुन देणेकरीता पंचायत समिती, धारणी, जि.अमरावती येथील कनिष्ठ अभियंता श्री.बोलके यांनी तक्रारदार यांचेकडे २ टक्के प्रमाणे ६,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे कनिष्ठ अभियंता श्री.बोलके यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेंविरुध्द पो.स्टे.धारणी, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.एस.एस.भगत अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पो.नि.संतोष इंगळे, पो.नि.केतन मांजरे, पो.ना.निलेश महिंगे, पो.कॉ.अभय वाघ व चालक पो.उप.नि.सतीश किटकूले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,२६६४९०२
टोल फ्रि नंबर — १०६४

(संतोष इंगळे)
पोलीस निरीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

OPPO F9 Pro · ©clicked by santosh